RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 October, 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 October, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : चौथा | ऑक्टोबर २०१६



सतगुरू रक्षण करतात (प्रश्नोत्तर) 5

आत्म्याने मनास केलेली विनंती (सत्संग) 15

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



सतगुरू रक्षण करतात

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे,
संतबाणी आश्रम, १६ पी एस राजस्थान – २८ मार्च १९८४

एक प्रेमी: *संतजी! आपण पूर्वी एकदा सांगितले होते की सतगुरू आपणांस कधी–कधी आंतरिक अनुभवांपासून लांब ठेवतात कारण आपल्या अंतरात अहंकार असल्याने आपण ते अनुभव पचवू शकत नाही व त्यांचा गैरवापर करू. त्यामुळे ते अनुभव शिष्यापासून दडवून ठेवले जातात. तुम्ही असेदेखील सांगितले होते की आपण आपल्या बाह्य जगातील जीवनाचेही अवलोकन करणे गरजेचे आहे की आपण पारमार्थिक उन्नती का करीत नाही? आपण नियमांचे पालन करण्यामध्ये अयशस्वी होत आहोत का? हे जाणून घेण्याचा काही मार्ग आहे का?*

बाबाजी: यासाठीच परमपिता कृपालजींनी आपणांस डायरी लिहिण्यास सांगितले होते, जेणेकरून आपणांस कल्पना येईल की पारमार्थिक मार्गावर आपण कोठे आहोत आणि आपण चांगली–वाईट कर्मं करीत आहोत काय? आपण जेव्हा कधी चांगले वा वाईट कर्म करीत असतो, तेव्हा आपणांस त्याची जाणीव असते. आपल्यासाठी इतर कोणी चांगले वा वाईट कर्म करतो असे कधी होत नाही. त्यामुळे त्या चांगल्या वा वाईट कर्मांचे फळ आपणांसच भोगावे लागेल.

फरीद साहेब सांगतात, ''मिरच्या पेरून खजूर मिळावेत अशी अपेक्षा शेतकरी कशी बरे करू शकतो? किंवा कापूस पेरल्यास लोकर कशी मिळू शकते?'' मी नेहमी सांगत असतो की आपण जेव्हा एखादे काम करीत असतो, तेव्हा त्याच्या परिणामाचीही आपणांस कल्पना असते. जेव्हा आपण काही पेरतो, तेव्हा त्यापासून काय उगवणार आहे, हे आपणांस माहीत असते. बाबा बिशनदासजी सांगत असत, ''तुम्ही वर्षाऋतु नसूनही पेरणी केली, तर भरगोस पिकाची अपेक्षा तुम्ही कशी करू शकता?''

जेव्हा आपण प्रामाणिकपणे व पवित्र विचारांनी ध्यान–अभ्यास करतो, तेव्हा आपणांस अशा प्रकारच्या कोणत्याही अडचणी येत नाहीत. तेव्हा सतगुरू आपणांसाठी काय–काय करतात, हेही आपण पाहू शकतो. परमार्थाच्या मार्गावर आपली उन्नती किती झाली व आपण अंतर्यात कुठला टप्पा गाठला आहे हे पाहू इच्छिणाऱ्या लोकांना स्वत:चे जीवन पवित्र करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. जे लोक इमानदारीने स्वत:चे जीवन पवित्र बनवून शुद्ध विचारांनी ध्यान–अभ्यास करतात, ते केवळ अध्यात्मिक प्रगतीच करीत नाहीत तर **सतगुरू त्यांचे रक्षण कशा रीतीने करतात**, याचादेखील अनुभव ते घेऊ शकतात.

मी नेहमी ही गोष्ट सांगत असतो की सुथरा नावाचा एक निर्भिड फकीर होता. त्याने अनेक मनोरंजक गोष्टी लिहिलेल्या आहेत. एकदा त्याने एका व्यक्तीस विचारले, ''घर मजबूत कसे बनते?'' त्या मनुष्याने उत्तर दिले, ''घरामध्ये आधारासाठी खांब लावल्याने घर मजबूत बनते.'' सुथरा फकीराने घरामध्ये खांब लावण्यास सुरूवात केली. सर्व घरभर त्याने खांब लावले. त्यामुळे घरामध्ये बसण्यासाठीदेखील जागा राहिली नाही. एकाएकी पाऊस पडण्यास सुरूवात झाली. सुथरा घराबाहेर उभा होता व पावसात भिजून तो थंडीने थरथर कापत होता. तेथून जात असलेल्या एका वाटसरूने त्यास विचारले, ''तुम्ही घरामध्ये का जात नाही?'' सुथरा म्हणाला, ''घरामध्ये जागा बाकी असती तर मी एखादा आणखीन खांब लावला नसता काय?''

एका बाजूने आपण विचारतो की सतगुरू आपल्या अध्यात्मिक प्रगतीचे रक्षण कसे करतात? तर दुसऱ्या बाजूने आपण काम, क्रोध, लोभाचा त्याग करण्यास तयार नसतो. आपण तक्रार करतो की **सतगुरू आपल्या अध्यात्मिक प्रगतीचे रक्षण करतात** याची आम्हास कशी खात्री पटेल? आपली अवस्था देखील सुथऱ्यासारखीच आहे ज्याने घरभर खांब लावले व स्वत:साठी थोडीसुद्धा जागा ठेवली नाही.

आपण आपल्या अंतरातील परमात्म्याची बसण्याची जागा काम, क्रोध आणि जगभरातील सर्व वाईट वस्तू आणि इच्छांनी व्यापून ठेवली आहे. आपल्या अंतरामध्ये जागाच उरली नाही, तर आपण अंतरात जाऊन, सतगुरू आपल्यासाठी काय करीत आहेत व ते आपल्या ध्यान–अभ्यासाचे रक्षण कसे करीत आहेत, हे कसे पाहू शकतो?

परमात्मा आपल्या अंतर्यात आहे. त्याचे सदैव लक्ष आपल्यावर आहे. तो तुम्ही विचार करण्यापूर्वीच तुमचे विचार जाणतो. तो तुमचे प्रत्येक कृत्य पाहतो, तुमच्या प्रत्येक भावनेचे आणि विचारांचे त्यास ज्ञान आहे. तुम्हांस जे काही हवे आहे ते तुम्ही मागण्यापूर्वीच तो तुम्हांस देतो कारण **सतगुरू तुमचे रक्षण करीत आहेत.**

सतगुरूंची अशी अपेक्षा असते की आपण आपले शरीर सोडून आपल्या खऱ्या घरी म्हणजे सच्चखण्डास जावे. त्यामुळेच **सतगुरू आपले नेहमी रक्षण करीत असतात**. सेवक जेव्हा वाईट कर्म करीत असतो, तेव्हा काळ सतगुरूंना जाणीव करून देतो की तुम्ही अशा मनुष्यास नाम दिले? हा मनुष्य नामदान प्राप्त करण्यायोग्य तरी आहे का? त्यावेळी सतगुरूंना शांत बसावे लागते. परंतु तरीही ते म्हणतात, ''हा माझा प्रिय पुत्र आहे, तो अजाण आहे. त्यास जाणीव नाही की तो काय करीत आहे? हळूहळू त्याच्या चुका त्याच्या लक्षात येतील आणि तो पुन्हा तसे करणार नाही.''

सतगुरू खूप सहनशील व सोशीक असतात. आपल्या अंतरात बसून **सतगुरू आपले व आपल्या ध्यान–अभ्यासाचे सदैव रक्षण करीत असतात**. त्यांनी आपणांस 'नाम' दिलेले असल्याने, त्यांना कल्पना असते की आपली वाईट कर्मांपासून कधी सुटका होईल? आपण वाईट कर्म करणे कधी सोडून देणार आहोत? त्यानंतर ज्याप्रमाणे बंदुकीची गोळी बंदुकीमधून अतिशय वेगाने बाहेर पडते, त्याचप्रमाणे आपला आत्मा शब्दावर आरूढ होऊन त्याच्या असली घरी म्हणजे सच्चखण्डास जाईल. आपली वाईट कर्मंच आपल्या आत्म्यास या शरीरामध्ये अडकवून ठेवतात. नाहीतर अशी इतर

कोणतीही गोष्ट नाही जी आपल्या आत्म्यास त्याच्या असली घरी, सच्चखण्डास जाण्यास अटकाव करू शकतात.

अंदाजे चार वर्षांपूर्वी महाराज कृपालजींच्या एका सत्संगीने सांगितले की अंतरामधून त्याचा आत्मा वरच्या दिशेने खेचला जात आहे आणि सतगुरू त्यास मारहाण करीत आहेत. तो भाजी विकण्याचे काम करीत असे. भाज्यांचे वजन वाढून फायदा व्हावा म्हणून तो त्यांवर पाण्याचा शिडकाव करीत असे व लोकांची फसवणूक करीत असे. तू हे चुकीचे काम करीत आहेस असे सतगुरू त्यास सांगत असत.

काही काळानंतर तो सत्संगी ७७ आर.बी. येथील आश्रमामध्ये आला आणि त्याने माफी मागितली. मी त्यास म्हणालो,''ज्या परमात्म्याने तुम्हाला माफ करावयाचे आहे, तो तुझ्या अंतर्यात आहे. तू आश्वासन दे की भाज्यांवर पाणी शिडकावून तू भाज्यांचे वजन वाढवणार नाहीस. तरच तुला माफी मिळू शकते.'' तेव्हा त्याने तसे आश्वासन दिले. तो अजुनही जिवित असून तोच व्यवसाय तो करीत आहे. स्वत:चा व्यवसाय प्रामाणिकपणे करण्याचा त्याने प्रण केलेला आहे. सामान्यत: संत असे करीत नाहीत, परंतु कधी-कधी लोकांना दाखविण्यासाठी असा चमत्कार करतात.

दिवसभरात केलेल्या वाईट आणि चांगल्या कर्मांची जाणीव आपणांस असणे गरजेचे आहे. दिवसाखेरीस जेव्हा डायरी लिहिण्यासाठी आपण बसू, तेव्हा आपणांस कल्पना हवी की आज आपण किती चांगली वा वाईट कर्मं केली? आपण हा देखील विचार करावयास हवा की आपण वाईट कर्मं का केली? आपणांस याचीदेखील जाणीव असावयास हवी की आज आपण अधिक ध्यान-अभ्यास का केला नाही व आळस का केला? आपण डायरी प्रामाणिकपणे लिहिणे आवश्यक आहे, जेणेकरून आपल्या लक्षात येईल की आपण पारमार्थिक मार्गावर आपण कोठे उभे आहोत आणि कोण-कोणत्या गोष्टी आपल्या आंतरिक प्रगतीमध्ये आडकाठी निर्माण करतात?

तुम्ही लोकं सत्संगी आहात, संतमतावर तुम्ही वाटचाल करीत आहात, तुम्ही सतगुरू धारण केले आहेत, म्हणून तुमच्या जीवनाचा विमा झालेला आहे. तुमच्या सतगुरूंना पूर्ण विश्वास आहे की ते तुम्हांस सच्चखण्डामध्ये घेऊन जातील, यात तसुभरही शंका नाही, परंतु तुम्ही सर्व सांसारिक लोकांची अवस्था पाहा की भोग–विलास व इतर वाईट गोष्टी त्यांचे नुकसान करीत आहेत. या गोष्टींना लोकं गांभिर्याने समजून घेत नसल्याने ते स्वत:चे जीवन पवित्र बनवित नाहीत आणि स्वत:चे जीवन सदैव मलीन बनवित आहे.

कबीर साहेब सांगत आहेत, ''विवाहानंतर आपल्या पत्नीसोबत वैवाहिक संबंध ठेवणे ठिक आहे. परंतु विवाहाशिवाय कोणाशी कामसंबंध ठेवण्यास व्यभिचार संबोधले जाते. जे लोक असा तऱ्हेचा व्यभिचार ठेवतात, त्यांना कधीच माफ केले जात नाही. त्यांचा आत्मा कधीच पवित्र बनू शकत नाही. ते कधीही शब्दावर आरूढ होऊ शकत नाही. तसेच स्वत:च्या खऱ्या घरी, सच्चखण्डासमध्ये जाऊ शकत नाही.''

गुरू नानक साहेब सांगतात,''जो मनुष्य स्वत:ची पत्नी सोडून दुसऱ्याच्या पत्नीकडे जातो, तो मनुष्य म्हणजे वास्तव सोडून अवास्तव वस्तूंच्या मागे पळणाऱ्या अंध व्यक्तीसमान आहे. आपण आपल्या जीवनात स्वत:च्या जीवनसाथीकडे दुर्लक्ष करून इतरांकडे जातो. परंतु असे केल्याने आपण स्वत:चाच विनाश करीत असतो.''

सुखमनी साहेबमध्ये गुरू अर्जुनदेवजींनी लिहिले आहे, ''परस्त्रियांकडे आपण पाहू नये. आपण सदोदीत सतगुरूंच्या सान्निध्यात रहावयास हवे. स्त्रियांनी पर–पुरुषाकडे कामुक नजरेने पाहू नये. हे केवळ स्त्रियांसाठीच लागू होत नसून ते पुरुषांनाही लागू पडते की पुरुषांनीही पर–स्त्रीकडे कामुक नजरेने पाहू नये.''

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात, ''कामवश होऊन स्त्री पर–पुरुषाशी कामसंबंध ठेवण्याची संधी वाया घालवित नाही. परंतु अंतसमयी काम,

क्रोध, लोभ तिचा विनाश करतात. जेव्हा एखादा पुरुष व्यभिचार करतो किंवा कुकर्मांमध्ये सामील होतो, तेव्हा त्याच्या बुद्धीवर काही परिणाम होत नाही का? तो स्वत:च विचार करतो की मी कुकर्म करीत आहे. त्याच्या अंतर्यात बसलेली शक्ती कुकर्म करणाऱ्या व्यक्तीस शाप देते. त्यामुळे तो सतत पस्तावतो आणि चिंताग्रस्त अवस्थेमध्ये रहातो. इतर लोकांना त्याच्या कुकर्मांची माहिती झाल्यानंतर त्याचा सतत अपमान होत राहतो.''

मला महाराज सावन सिंहजींच्या चरणी बसण्याची संधी लाभली आहे. मी त्यांचे अनेक सत्संग ऐकले आहेत. त्या महान सतगुरूंचे शब्द अद्यापही माझ्या कानामध्ये गुंजत आहेत. ते नेहमी सत्संगामध्ये सांगत असत, ''विवाहाशिवाय तुम्ही राहू शकत नसाल तर तुम्ही विवाह करा. विवाह करण्यामध्ये चुकीचे काय आहे? अविवाहित राहून आपण बाह्यरित्या दर्शवितो की मी लग्न केलेले नाही. परंतु अंतरातून मात्र आपण स्त्रीयांशी भोग भोगण्या बद्दलचे विचार करीत असतो. बाहेर बसून लोकांसमोर आपण खूप पवित्र असल्याचे नाटक करतो, परंतु अंतरातून मात्र पापच करीत असतो.''

सतगुरू तुमच्या अंतरामध्ये वसत असल्याने ते तुमच्या पापांपासून अनभिज्ञ राहू शकतात काय? आपण जे काही करतो, त्या सर्व कृत्यांचे ज्ञान सतगुरूंना असते. तुम्ही स्वप्नातही स्त्रीसोबत भोग भोगण्याचा विचार करीत नसाल तर तुम्ही बेधडकपणे दावा करू शकता की तुम्ही पवित्र आहात. मग परमपिता परमात्मा तुमच्यावर कृपाळू होईल कारण तुम्ही या आजारावर ताबा मिळविलेला आहे. अशा वेळी तुम्ही विवाह करणार नसाल तर ते बरोबर आहे. परंतु काम तुम्हाला स्वप्न आणि विचार करतानाही सतावत असेल तर तुम्ही विवाह करण्यास काही हरकत नाही. अशावेळी तुम्ही नि:संशयपणे विवाह करावा. त्यामुळे ध्यान–अभ्यासामध्ये तुमची उन्नती होण्यास मदत मिळेल.

मी अनेकदा सत्संगांमध्ये सांगितले आहे की सतगुरू तुम्हाला तुमच्या जीवनसाथीशी एकनिष्ठ राहण्यास सांगतात कारण त्याचा आपल्या अध्यात्मिक

उन्नतीवर प्रभाव पडत असतो. जे लोक या स्थुल जगामध्ये पवित्रता राखत नाहीत, त्यांची सूक्ष्म जगामध्ये काय अवस्था होईल? कारण तेथे त्यांना सूक्ष्म पुरुष आणि स्त्रिया भेटतात जे अतिशय तेजस्वी आणि सुंदर असतात. जी लोकं स्थुल शरीरात कामुक भावनेवर नियंत्रण ठेवू शकत नसतील, ते जेव्हा सूक्ष्म जगातील अशा तेजशील पुरुष आणि स्त्रीयांच्या सहवासामध्ये येतील तेव्हा ते स्वत:चे पावित्र्य राखू शकतील काय? याचसाठी आपण पावित्र्य राखणे गरजेचे आहे.

काही संत गृहस्थी झाले तर काही त्यागी देखील झालेले आहेत. गृहस्थी संतांनी असे नाही सांगितले की त्याग वाईट आहे, ना त्यागी संतांनी गृहस्थीस वाईट म्हटले आहे. तुम्ही गृहस्थी असा वा त्यागी, याचा काहीच फरक पडत नाही. संत नेहमी सांगतात की तुमचे मन तुमच्या अंतरामध्ये कामाचा आवेग निर्माण करीत नसेल तर तुम्ही विवाह करू नका. संतमतामध्ये विवाह करण्यास मनाई केलेली नाही. तुम्ही विवाह करू शकता.

मी वारंवार सांगतो की तुम्ही जीवनामध्ये पवित्रता राखा. पावित्र्यपूर्ण जीवन जगण्याचा एक निराळाच आनंद आहे. अशी एक वेळ नंतर येते की जेव्हा पवित्रता त्यागण्याची इच्छाच आपणांस होत नाही.

प्रश्नकर्त्याने प्रश्न विचारला होता की आपल्या ध्यान-अभ्यासामध्ये होणारी प्रगती जी सतगुरूंनी दडवून ठेवली आहे. तिच्याबद्दल आपणांस कशी माहिती होईल? जेव्हा पाऊस पडू लागतो वा बर्फवर्षाव होतो, तेव्हा त्या ठिकाणाहून वाहणारा वारा थंड असतो. तो वारा चोहोवाजूस गारवा पसरवतो. याचप्रमाणे तुम्ही जीवनामध्ये पावित्र्य राखले, तर ते सतगुरूंना समजणार नाही का? ते तर तुमच्या अंतरामध्ये वसत आहेत. तुम्ही पवित्र जीवन जगू लागलात तर आपोआपच तुमच्या अध्यात्मिक प्रगतीची तुम्हांस जाणीव होईल. तुमच्या आजूबाजूचे लोक देखील म्हणतील की हा एक पवित्र पुरुष वा ही एक पवित्र स्त्री आहे.

सैन्यामध्ये एकदा चोरी झाली आणि बऱ्याच बंदुका चोरीस गेल्या. असे म्हटले गेले की हे सर्व पहारेकऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे घडले. कमांडर तसेच तेथील प्रत्येकजण या चोरीमुळे विवंचनेमध्ये होता की असे कसे घडले? अनेकांना सजाही दिली गेली, ज्यांमध्ये काही निर्दोष लोकं देखील होती. खरे काय घडले याची माहिती कशी मिळेल? सैन्यामध्ये मला भाईजी वा ज्ञानीजी असे संबोधले जाई. प्रत्येकजण जाणत होता मी सत्यवादी आणि प्रामाणिक मनुष्य आहे. त्यामुळे माझा खूप आदरमान केला जाई.

आमच्या कमांडरने सर्वांना सांगितले की प्रत्येकाने ज्ञानीजींच्या शरीरास स्पर्श करून म्हणावे, ''ज्ञानीजी! मी प्रामाणिक असून चोरीबद्दल मला काहीच माहिती नाही.'' पंधराशे लोकांपैकी केवळ चार जण या चोरीमध्ये सहभागी होते, जे माझ्या शरीरास स्पर्श करून असे म्हणू शकले नाही की ते प्रामाणिक आहेत आणि चोरीबद्दल त्यांना काहीच माहिती नाही.

माझ्या पवित्रतेमुळेच ते माझ्या शरीरास स्पर्श करू शकले नाहीत. मी कधीही माझ्या पवित्रतेबद्दल त्यांना सांगितले नव्हते. जे प्रामाणिक होते, त्यांना मला स्पर्श करण्यास कोणतीही अडचण नव्हती. त्यांनी मला स्पर्श करून म्हटले, ''मला याबद्दल काहीच कल्पना नाही.'' खरे चोर माझ्या जवळ आले असता, ते थरथर कापू लागले. तुम्ही जर पवित्र जीवन जगत असाल, तुम्ही अंतरामध्ये पवित्र असाल तर ती पवित्रता अतिशय महान असेल जी चौफेर पसरलेली असेल. तुमच्यासमोर येऊन लोकं खोटे बोलू शकणार नाही. तुम्ही पवित्र जीवन जगत असाल, तर तुमच्या मित्रमंडळींना तसेच शेजारपाजाऱ्यांना ते कळणार नाही का? निश्चितपणे तुमच्या पवित्रतेचा सुगंध सर्वत्र दरवळत राहील. त्यांचे नाक स्वच्छ असेल, तेच हा सुगंध घेऊ शकतील, त्यांनाच त्याचे ज्ञान होईल.

सैन्यामध्ये मांस भक्षण आणि मदिरापान करणे अतिशय सामान्य बाब आहे. मी असा एक मनुष्य होतो की या वस्तू मी खात–पीत नव्हतो. सर्व



लोकांना कल्पना होती की मी मांस–मदिरा प्राशन करीत नाही. सैन्यामध्ये नोकरी करीत असताना, लहान–सहान गोष्टी विकत घेण्यासाठी मी कधीच बाहेर गेलो नाही, माझ्या मित्रांकरवीच वस्तू मागवीत असे, कारण मी धार्मिक विचारांचा होतो आणि मी नेहमी माझा वेळ धार्मिक स्थानांवर व्यतित करीत असे. मी जीवन पवित्र राखत होतो. या पावित्र्यतेमुळेच मला सर्वजण ओळखत होते; ते माझी शपथ घेत असत.

मी वारंवार सांगतो की आपण ज्या घरामध्ये वा ज्या जमिनीवर राहतो, त्या घरास आणि जमिनीस आपल्याबद्दल अभिमान वाटावयास हवा की माझ्यावर कोणी सद्‌गृहस्थ वास्तव्य करीत आहे. तुमचे सतगुरू पवित्र व पावन आहेत. ते या जगातील मलिनतेच्या आणि वाईट वस्तुंच्या पलिकडे वावरत असतात. त्यांच्याप्रमाणेच आपणदेखील पवित्र–पावन बनावयास हवे जेणेकरून ते आपल्या अंतरामध्ये प्रगट व्हावेत आणि त्यांना आपला अभिमान वाटायास हवा की त्यांचा शिष्य पवित्र आणि पावन आहे.

परमपिता कृपाल जेव्हा पहिल्यांदा माझ्या आश्रमामध्ये आले, तेव्हा मी त्यांना म्हणालो, ''हे सतगुरू! मी तुम्हाला काय विचारू हेच मला कळत नाही. माझे अंत:करण आणि बुद्धी रिक्त असून बालपणापासूनच मी यांना रिक्त ठेवले आहे.'' महाराजजी हसून म्हणाले, ''मी तुझे अंत:करण आणि बुद्धी रिक्त पाहूनच पाचशे किलोमीटरचा प्रवास करून तुला काही देण्यासाठी येथे आलो आहे.'' ते कृपाळु होते तर मी कृपेचा भुकेलेला होतो. मी अग्नीप्रमाणे जळत होतो तर त्यांच्याकडे नाम होते. त्यांनी माझ्यावर नामाचा वर्षाव करीत माझ्या तप्त अंत:करणास शांत केले. ***



आत्म्याने मनास केलेली विनंती

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, हुजूर स्वामीजी महाराजांची वाणी
मुंबई – ११ जानेवारी, १९९४

मी परमात्मारूपी गुरूदेव सावन–कृपालजींच्या चरणी वंदन करतो. त्यांनी या गरीब आत्म्यावर दया केली आणि विषय–विकारांच्या जंगलात भरकटत असलेल्या आत्म्यास नामामृत पाजून शांत केले. सहजोबाईने सांगितले होते:

राम तजूँ पर गुरु न बिसारूं, हरि को गुरु सम न निहारूं।

मी रामास विसरू शकते, परंतु सतगुरूंना मात्र कधीच विसरू शकत नाही. खरेतर ना संत–महात्मा परमात्म्याचे विरोधक असतात, ना ते त्यांची निंदा करतात. वास्तविकत: ते परमात्म्याची प्रिय मुलेच असतात. परंतु परमात्मा आपल्या अंतरात असूनही आपणांस अनेकदा किडे–पाखरे, हत्ती–घोडे बनून या जगात यावे लागले. अनेकदा मनुष्य जन्म लाभूनदेखील आपण येथे फेऱ्या मारत राहिलो, तरीही आपणांस कधीही शांती लाभली नाही. येथे आपण तळमळत आलो आणि तळमळतच परत गेलो. आपणांस ना परमात्मा भेटला ना त्याने आपला जन्म–मरणाचा फेरा चुकविला.

सहजोबाई सांगते, ''सतगुरूंनी माझ्या अंतरामध्ये ज्ञानदीप, नामज्योत प्रज्वलित केली व पाच दरोडेखोर दाखवून दिले. परमात्म्याचा शब्द–रूपी प्रकाशदेखील सतगुरूंनी दाखविला. अंतरामध्ये दडलेल्या परमात्म्यास प्रगट करून आपणांस दाखवून दिले. हे सर्व करण्यामागे मोठेपण अर्थात सतगुरूंचेच आहे. परमात्म्याने आपल्या कर्मांनुसार आपणांस कुटुंब जंजाळामध्ये गुंतविले परंतु सतगुरूंनी सुरत–शब्दाचा अभ्यास करवून या सर्व बंधनातून आपली सुटका केली. त्यामुळे जरी मी पृथ्वीचा कागद बनविला, समुद्रातील संपूर्ण पाण्याची शाई केली व सर्व वनस्पतींना जोडून लेखणी म्हणून वापर केला, तरीही मी गुरू–महिमा लिहू शकत नाही.'' गुरू नानकदेवजी सांगतात:

किस मुख गुरु सलाहिए गुरु करण कारण समरथ।

ज्या व्यक्तीने खडीसाखर खाल्ली आहे, तीच व्यक्ती खडीसाखरेच्या चवीचे वर्णन करू शकते. त्याचप्रमाणे ज्या मुनष्याने आपल्या शरीराची नऊ द्वारे रिक्त करून, दोन्ही नेत्रांच्या मागच्या बाजूस जाऊन आपल्या आत्म्यावरील स्थूल, सूक्ष्म आणि कारण ही तिन्ही आवरणे दूर सारीत आपल्या सतगुरूंचे मन–मोहक स्वरूप अंतरामध्ये प्रगट करून घेतले, त्याच मनुष्यास गुरूशक्तीचे ज्ञान होते. सतगुरू म्हणजे मनुष्य देहात दडलेला हिरा आहे, मडक्यात सामावलेला समुद्र आहे. ते गरीबी धारण करून एखाद्या सामान्य मनुष्याप्रमाणे आपले जीवन जगतात, परंतु अंतरातून मात्र ते परमात्म्याशी समरस झालेले असतात. महात्मा चतुरदास सांगतात:

इक दिन सभा उल्लआँ लाई, बैठे मिल नर नारी जी।
कोई आखे सूरज नाहीं, कौन करे उजयारी जी।
वारो वारी सब्बे बोले, कर कर सोच विचारी जी।
जे कोई सूरज सच्चा मन्ने ते अकल ओस दी मारी जी।
ओना विच इक वड्डा उल्लू, बानी ओस उचारी जी।
अज तक सूरज हम नहीं डिट्डा, वड्डी उमर हमारी जी।

मनमुखास घुबड तर गुरूमुखास हंस असे संबोधले आहे. घुबडे राहत असलेल्या वृक्षावरच एकदा एक हंस बसला होता. तो त्या घुबडांना म्हणाला:

ईक हंस टीसी पर बैठा, बाणी ओस उचारी जी।
है प्रभात देख लो सारे, लक्खां किरण पसारी जी।
उल्लू सब टैं टैं कर हँसे, हंस मौन तब धारी जी।
चतुरदास ऐह अजब अदालत, तीन लोक से न्यारी जी।।

हंसाने सूर्यास पाहिले असल्याने तो घुबडांना सांगू लागला की, पृथ्वीवर कितीतरी सूर्यकिरणे पडत आहेत. परंतु तुम्ही जर सूर्यास पाहिलेच नाही तर त्यामध्ये सूर्याचा काय दोष? मनमुखांच्या सभेत सर्वजण चर्चा करीत होते की परमात्मा विषयक कथा काल्पनिक आहेत. खरेतर परमात्मा नसतोच मुळी. जर परमात्मा असता तर आम्हांस दिसला नसता काय? महात्मा सांगतात:

मुर्शिद पासों इल्म न पढ़या, ताई यों सदा गँवार रहे।

मनमुखास ना कोणी सतगुरू लाभले ना त्याने अध्यात्मिक अभ्यास केला व ना अंतर्यात प्रगती केली. मनमुख म्हणतो, ''मी इतकी पुस्तके वाचली आहेत. परमात्मा जर खरोखरीच असता तर मला तो ग्रंथ–पुस्तकांमध्ये सापडला असता. माझे वय सर्वांत जास्त असून परमात्मा माझ्यापेक्षा लहान आहे.'' मन–इंद्रियांची हद्द पार करून उच्च कोटीस पोहोचलेला एक गुरूमुख त्या मनमुखास सांगू लागला,''परमात्मा तुझ्या अंतर्यात असून तुम्ही त्यास पाहू शकत नसाल तर त्यात त्याचा काय दोष?'' तेथे तो गुरूमुख एकटाच होता व मनमुख अनेक होते. ते सर्व मस्करी करीत हसत म्हणू लागले की हा विनोद करीत आहे, खरेतर परमात्मा मुळात अस्तित्वातच नाही.

सैदपूर येथे राहत असलेल्या बहादुर सिंहने महाराज सावन सिंहजींद्वारे नामदान घेतलेले होते. त्याचे महाराज सावन सिंहजींच्या आश्रमाशेजारीच वास्तव्य होते. तो स्वानुभव सांगत असे,''मी आजूबाजूच्या गावांमध्ये जाऊन एक–एक, दोन–दोन तास तेथील लोकांना समजावून सांगत असे की बाबा सावन सिंहजींचे अमुक–अमुक वैशिष्ट्य आहे, सतगुरूंच्या भेटीचे असे–असे फायदे असतात. बाबा सावन सिंहजी अतिशय उच्चकोटीस पोहोचलेले महात्मा आहेत. मृत्युसमयी ते फक्त त्यांच्या नामधारींचाच सांभाळ करतात असे नाही, तर इतर ज्या कोणाला त्यांच्या माहत्म्याची प्रचिती होते त्यांचाही ते सांभाळ करतात. त्यावर माझा भाऊ लाभ सिंह हळूच बोलत असे की बाबा सावन सिंहजींचा हा प्रतिनिधी आहे. मी मेहनतीने दोन तास केलेल्या चर्चेपेक्षा त्या लोकांवर लाभ सिंहच्या त्या छोट्याशा वाक्याचा अधिक प्रभाव पडे.''

त्याकाळी इंग्रजांचे राज्य होते. कुसंगतीत राहून लाभ सिंह दरोडे घालू लागला. त्याकाळी लोकं लपून दरोडे घालून लोकांची हत्या करीत असत. आजदेखील अशा लोकांची कमतरता नाही. सैदपूर येथे महाराज सावन सिंहजींचा सत्संग आयोजित केलेला होता. तेव्हा लाभ सिंह म्हणाला, ''मी

उद्या महाराजजी येथे सत्संगासाठी आले असता त्यांच्या सर्व गोष्टी चोरून त्यांचेदेखील अपरहण करीन.'' बहादुर सिंहला कल्पना होती की लाभ सिंह सोबत बरीच लोकं आहेत. कदाचित तो बोलतो त्याप्रमाणेच अघटित होऊ नये. बहादुर सिंह महाराज सावन सिंहजींच्या चरणी गेला व म्हणाला, ''माझा भाऊ खूनी आहे. मला काहीच कळत नाही. त्याने असे म्हटले आहे.''

महाराज सावन सिंहजी म्हणाले,''बहादुर सिंह! तू का घाबरतोस? यामध्ये घाबरण्यासारखे काय आहे? तो जर माझे अपहरण करीत असेल, तर मी स्वत:च त्याच्यासोबत जाईन. संत जेथे जातात तेथे ते स्वत: नामस्मरण करतात, तसेच इतरांद्वारेही नामस्मरण करून घेतात.''

त्या महान सतगुरूंनी असा काही चमत्कार केला की दुसऱ्या दिवशी लाभ सिंह स्वत:च सत्संगाच्या प्रबंधनाचे काम करताना दिसला. जेव्हा त्याने महाराज सावन सिंहजींचा सत्संग ऐकला, तेव्हा त्याने महाराजजींचे चरण पकडले. तो म्हणाला, ''तुम्ही मला नाम द्या. मला माफ करा.'' महाराजजी हसून म्हणाले,''ही काय पद्धत आहे? माझे पाय तरी सोड.'' लाभ सिंह म्हणाला, ''तुम्ही होकार दिला तरच मी तुमचे पाय सोडेन.'' महाराजजी म्हणाले, ''एका अटीवर तुला नाम मिळेल की यापुढे तू कोणाचेही अंत:करण दुखावणार नाहीस आणि चोरी करणार नाहीस.'' लाभ सिंह म्हणाला, ''मी आतापासून सर्वकाही सोडून देतो.''

लाभ सिंहाने त्याची वडिलार्जीत मिळालेली जमीन विकली आणि ज्या-ज्या लोकांना त्याने लुटले होते, त्यांची रक्कम परत करण्यासाठी त्या लोकांकडे तो गेला. त्याने एका नवविवाहित महिलेचे दागिने चोरले होते. सामान्यत: मालवा येथील मुली त्याकाळी एक मोठी वेणी आणि एका बाजूस फुले माळत असत. लाभ सिंह त्या नवविवाहितेच्या चोरलेल्या दागिन्यांचे पैसे देण्यासाठी गेला असता ती मुलगी म्हणाली, ''बंधु! माझे दागिने शंभर रुपयांचे होते परंतु तू मला पन्नासच रुपये देत आहेस.'' त्यावर लाभ सिंह

म्हणाला, ''ताई! मी जेवढे पैसे कमावले होते, तेवढेच तुला परत करीत आहे. चोरीच्या मालाचे पूर्ण मूल्य कोणी देतो का?''

पुढे लाभ सिंह नेक मार्गानेच पैसे कमावू लागला. त्याच्या अंतिम समयी महाराजजी प्रगट झाले असता तो रडू लागला व म्हणाला, ''माझा आत्मा तुम्हाला सामोरा होऊ शकत नाही. मला लाज वाटत आहे की मी या महात्म्यांशी किती वाईट वर्तणूक केली, तरीही माझ्या अंतिम समयी माझा सांभाळ करण्याठी ते आले आहेत.''

आपण सर्वजण अंतरातून मुळात चांगले मनुष्य असतो. सर्वांच्या अंतरामध्ये आत्मा आहे जो निर्दोष असतो. संतांची नजर आत्म्यावर असते. सर्व महात्मे सांगतात की आपल्या आणि परमात्म्याच्या दरम्यान अडथळा आपल्या मनाचा आहे. जेव्हा मानाचा हा अडथळा आपण दूर करतो तेव्हा परमात्म्यास भेटणे काहीच अवघड नसते कारण परमात्मा दूर नसून आपल्या अंतरातच आहे.''

तुमच्या समोर स्वामीजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे. या वाणीमध्ये आत्मा मनास प्रेमाने समाजावतो, ''मी तुझी दासी असून जन्म-जन्मांतरापासून तुझ्या बंधनामध्ये अडकलेलो आहे. माझ्या विनंतीचा मान राखून तू सतगुरूंच्या दरबारामध्ये चल आणि त्यांच्याद्वारे नाम प्राप्त करून घे. मी सतगुरूंद्वारे ऐकले आहे तसेच त्यांनी कृपा करून मला अंतर्यात दाखविलेदेखील आहे की कशाप्रकारे कंगाल होऊन तू येथे भरकटत आहेस, पावलो-पावली तुला ठेच लागत आहे, तुझे खरे घर ब्रह्मस्थान आहे. तू तेथील कमांडर इन चीफ आहेस. तू जर माझ्यासोबत सतगुरू चरणी आलास, तर तुझ्या घरी जाऊन तेथे तू राजा बनून राज्य करशील व मी पुढे सत्पुरुषाच्या दरबारामध्ये निघून जाईन.''

मन पुढे उत्तर देईल की हे माझ्या आवाक्यामध्ये नाही. मी विषय-विकारांमध्ये गुंतून पडलेलो आहे. कदाचित सतगुरू सत्संगाद्वारे शाब्दीक थप्पड मारून मला माझ्या घराकडे वळवतील. माझा कशावरचा ताबा नाही.

हे ऐकून आत्मा संतुष्ट होतो व मनास सतगुरूंच्या दरबारात घेऊन येतो. पुढे दोघे मिळून अध्यात्मिक चढाई करतात. मन ब्रह्मदेशात पोहोचते तर आत्मा सतलोकात पोहोचतो. आत्मा सतलोकाचा प्रिय पुत्र आहे. कबीरसाहेब सांगतात:

कहो कबीर ऐह राम की अंश, जर कागज पर मिटे ने मंस।

तुमच्यासमोर स्वामीजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे, जी लक्षपूर्वक ऐकण्यासारखी आहे:

मन रे मान वचन इक मेरा।। मन रे मान वचन इक मेरा।।

मैं तेरी दासी जनम जनम की। तू हुआ स्वामी मेरा।।

आत्मा मनास सांगत आहे,''या जगाच्या निर्मितीपासून मी तुझ्या वशात आहे, तुझा दास बनून तू सांगितल्याप्रमाणे काम करीत आहे आणि तू माझा मालक बनलेला आहेस.''

तीन लोक का नाथ कहावे। तीन देव तेरा चेरा।।

आत्मा मनास प्रेमाने सांगत आहे, ''तू या त्रैलोक्याचा मालक आहेस. ब्रह्मा, विष्णु आणि शिव तुझे शिष्य आहेत. ब्रह्म जगाची निर्मिती करतो, विष्णु त्याचे पालन करतो तर शिव त्याचा संहार करतो.'' काळापासून मन निर्माण झाले आहे.

ऋषि मुनि सब पर हुकुम चलावे। जती सती सब घेरा।

आता आत्मा मनास सांगत आहे,''प्रिय मित्रा! जति-सती, ऋषी-मुनि, सर्वजण तुझ्या बोटाच्या इशाऱ्यावर नाचत आहेत. तू ज्यास जे काही काम सांगतोस, ते काम तो मान खाली घालून गपचूप करतो.''

वेदव्यासजींचे एक शिष्य जैमिनी ऋषी खूप विद्वान होते. त्यांनी कर्मांच्या फिलॉसॉफीवर एक पुराण लिहिले जे अठरा पुराणांपैकी एक आहे. त्यांनी तो ग्रंथ लिहिला व त्यांचे गुरू वेदव्यासजींसमोर ठेवला. वेदव्यास यांना योगिश्वर ही पदवी प्राप्त होती. ते अफाट ध्यान-अभ्यास करीत व अंतर्यात जात

असत. वेदव्यास जैमिनी ऋषींना म्हणाले, ''जैमिनी! तुझा ग्रंथ सुरेख आहे. परंतु याने तुझे ईसिप्त पूर्ण होत नाही. तुझे वाचन–लिखाण कोणत्याही वेळी तुझे नुकसान करू शकते.'' जैमिनी म्हणाले, ''हा ग्रंथ खूप चांगला आहे. याद्वारे सर्वांना ज्ञान मिळते की वाईट कर्मं करू नयेत. मनुष्याने जर चांगली वा वाईट कर्मंच केली नाहीत तर तो या जगामध्ये पुन्हा येणार नाही.'' जैमिनी ऐकत नाहीत हे पाहून वेदव्यासजी म्हणाले,''योग्य वेळ आल्यावर मी तुला सांगेन. मायाने खूप मोठ–मोठ्या कीर्तिमान लोकांची देखील फजिती केली आहे. माया भ्रमास म्हणतात.''

चांगली व वाईट कर्मं मिळून आपणांस मनुष्य जन्म मिळतो. जर आपली सर्व वाईट कर्मंच असती तर आपण नरकात गेलो असतो व सर्वच चांगली कर्मं असती तर आपण स्वर्गात वास करीत असतो. परंतु आपण काही पुण्ये तर काही पापे केली म्हणून आपणांस मनुष्य–जन्म मिळाला. मनुष्यजन्मापासून तेच लोक फायदा करून घेतील ज्यांना परिपूर्ण सतगुरू लाभतात.

एके रात्री खूप मोठे वादळ आले. वेद–व्यास एका स्त्रीचे स्वरूप धारण करून जैमिनी ऋषींच्या कुटीराकडे गेले. ती स्त्री जैमिनी ऋषीस म्हणाली, ''मी एका राजाची राजकन्या असून, मी रस्ता चुकून माझ्या सवंगड्यांपासून दुरावलेली आहे. तुम्ही मला येथे रात्रीपुरता आसरा द्यावा व सकाळी मला माझ्या स्थानी नेऊन सोडावे.'' जैमिनी म्हणाले, ''माझ्या कुटीरामध्ये मी तुला राहण्यास परवानगी देणार नाही.'' ती स्त्री ऋषींची स्तुती करू लागली की ऋषी मृदु अंत:करणाचे असतात. ते सर्वांवरच कृपा करतात. आपण सहसा कोणाच्या बोलण्यामुळे जरी फसत नसलो तरी कोणी आपली स्तुती केली तर मात्र आपण त्यामध्ये फसतो. महात्मा परोपकारी असतात, असे म्हणत जेव्हा त्या स्त्रीने जैमिनींची स्तुती केली, तेव्हा जैमिनी म्हणाले, ''तू रात्रभर माझ्या या कुटीरामध्ये झोप परंतु बाहेरून मी जरी आवाज दिला, तरीही तू दार उघडू नकोस.''

आयुष्यभर जैमिनी जंगलातच राहत असल्याने त्यांनी स्त्रीमुख कधी पाहिले नव्हते. ते ध्यान–अभ्यासास बसले असता त्यांच्या समोर ते स्त्रीमुख सारखे येऊ लागले. आपले मन आपणांस एखाद्या वकीलाप्रमाणेच काही कृत्य करण्यासाठी प्रेरीत करीत असते. ऋषींच्या मनात विचार आला की ती स्त्री एकटी असून आपणही एकटेच आहोत. काहीवेळ तिच्यासोबत गप्पा–गोष्टी करण्यास काय हरकत आहे? आपण ध्यानासाठी नंतर बसू.

दरवाजा वाजवून जैमिनी ऋषींनी दरवाजा खोल अशी हाक दिली. ती स्त्री म्हणाली, ''तुम्हीच म्हणाला होता की मी जरी सांगितले तरी दरवाजा उघडू नकोस.'' ते ऐकून जैमिनी ऋषी तिला धमकावत म्हणाले की,''हे कुटीर माझे आहे की तुझे?'' स्त्री म्हणाली की,''ते मला माहीत नाही. परंतु मी तुमच्या सांगण्यावर ठाम आहे. मी दरवाजा उघडणार नाही.'' त्यानुसार तिने दार काही उघडले नाही.

कामाचा वेग मनुष्यास निर्लज्ज बनवितो. समिप उभी असलेली व्यक्ती सुद्धा दिसत नाही. मनुष्य आपआपसांमधील नाते–संबंधही विसरतो, पण मनास मारत नाही. जैमिनी ऋषींनी कुटीराचे छप्पर फाडून आतमध्ये उडी मारली. समोर पाहता गुरू वेदव्यास मांडी घालून बसले होते. त्यांना पाहून जैमिनी ऋषी कावरे–बावरे झाले. वेदव्यास हसून म्हणाले,''काय बंधु जैमिनी! तू तर म्हणत होतास की मी इतका सुरेख ग्रंथ लिहिला असून, मी मनाच्या आहारी जात नाही. मग हे काय आहे?''

आपले सतगुरू महाराज कृपाल सांगत असत, ''पुस्तक लिहिणे मन–बुद्धीचे काम आहे. जेथे मन–बुद्धीची सीमा संपते, तेथूनच अध्यात्मिक मार्गाची सुरूवात होते.'' मन जड आहे, ते आत्म्याची शक्ती घेऊन, आत्म्यासच अशक्त व कमकुवत करून टाकते. ज्याप्रमाणे वृक्षांवर आपण अमरवेल पाहतो. अमरवेलीचे स्वत:चे मूळ नसते. वृक्षापासून सत्वाचा आधार घेऊन ती त्या वृक्षासच अशक्त करून टाकते.

तेरे बस सुर नर और जोगी। कोई तेरा हुकम न फेरा।

आपण सांगता, ''तू राक्षस तसेच देवांनाही स्वत:च्या ताब्यात ठेवले आहेस. या स्थूल जगात असताना, स्थूल मन आपली पाठ सोडत नाही. आपण सुक्ष्म जगतामध्ये गेल्यावर, तेथे सुक्ष्म मन आपला पाठलाग करते, ते आपणांस एखाद्या मर्कटाप्रमाणे नाचावयास लावते. आपण कारण देशामध्ये गेल्यावर आपल्या मागे कारण मन लागते. जेथे तन आणि मन असते, तेथे आपणांस सुख-शांती कशी बरे लाभेल?''

जिस चाहे तिस जगत फँसाए। और चाहे तिस करे निबेरा।

सर्वकाही तुझ्या हातात आहे. ज्यास तू येथे गुंतवून ठेऊ इच्छितोस, त्यास तू कुकर्मांमध्ये, विषय-विकारांमध्ये आणि मद्य-मासाचे सेवन करण्यात अडकवतोस; त्यास तू शुद्धीत येऊच देत नाहीस. मात्र ज्याचा बचाव करण्याची तुझी इच्छा असते, त्यास साधू-संगतीत आणतोस; त्यास शब्द-नामाची कमाई करण्यास प्रेरीत करतोस.

ऐसी महिमा सुनी तुम्हारी। ताते तुम पै करूँ निहोरा।।

मी माझ्या गुरूंद्वारा तुझा महिमा ऐकलेला आहे की हा सर्व तुझाच खेळ आहे, सर्व काही तुझ्याच हातात आहे त्यामुळे मी तुझ्यासमोर विनंती करतो.

इस तन नगरी तुच्छ देश में। क्यों कैदी होय पड़े अंधेरा।।

या अंध:कारमय नगरामध्ये कैदी बनून तू का बसला आहेस. या नगरास सोडून दुसऱ्या कोणत्या एखाद्या नगरामध्ये जाऊन खितपत पडावे लागेल याची कल्पना आपणांस नाही.

सतगुरू मोसे कहा बचन इक। मन को संग ले चलो सबेरा।।

मला माझ्या सतगुरूंनी कृपा करून सांगितले आहे की मनास सोबत घेऊन तू स्वगृही, सचखण्डास वाटचाल कर. आपण जेव्हा मनास सोबत

घेत नाही, त्यास हठकर्म वा शिस्तीचा प्रयोग करून त्यावर दबाव आणतो, तेव्हा आपण मंदिर–गुरूद्वारांमध्ये जाऊन आश्रय घेतो किंवा घरा–दाराचा त्याग करून जंगलात वा पर्वतांवर निघून जातो, इतर लोकांना आपण महात्मा आहोत असे प्रदर्शित करतो. परंतु जेव्हा कधी मनास संधी मिळते, तेव्हा ते आपणांस पुन्हा जग–रहाटीमध्ये आणते, आपण दुष्कर्मे करू लागतो.

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात की मनास शिस्तीचा प्रयोग करून वा हठकर्मांचा वापर करून ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे एखाद्या विषारी सर्पास टोपलीमध्ये झाकून ठेवण्यासारखे आहे. जोपर्यंत सर्प टोपलीत डांबलेला आहे, तोपर्यंत आपण त्याच्या विषापासून सुरक्षित आहोत. परंतु त्या सर्पामध्ये राग आणि विष दोन्ही ठासून भरलेले आहे. टोपलीत डांबला असता त्याच्यामध्ये अधिक राग व अधिक विष निर्माण होते. त्यामुळे जेव्हा त्यास संधी मिळते, तेव्हा तो दंश करण्याची संधी सोडत नाही. आपण सांगता:

सप पिड़ाई पाई ऐ विख अंतर मन रोस।

सर्पामध्ये जेवढा राग आहे, तेवढेच विषदेखील आहे. योगी लोकांकडे एक विशिष्ट औषधी वनस्पती असते, जिचा वापर सर्पांच्या दातांवर केल्याने ते दात निष्प्रभ होतात किंवा ते सर्पांचे दातच काढून टाकतात, मग तो सर्प दंश करूच शकत नाही. अशा सर्पांना गळ्यात घालून फिरताना आपणांस अनेक शहरात लोकं आढळतात. त्या सर्पांचे मुख व जिव्हा पूर्वीप्रमाणेच दिसते, परंतु त्याची विषाची कुपी काढून टाकलेली असते. तर मग सर्पाचे विषारी दात कसे काढून टाकावेत?

मन मूसा पिंगल पया पी पारा हर नाम।

या विषावर 'नामरूपी' पारा औषधाचे काम करतो. पारा प्यायल्यावर उंदीर हालचाल करू शकत नाही. तो जिवंत असतो, काहीशी हालचाल करतो, परंतु दूरवर पळू शकत नाही.

ता ते तुम पै करूँ बीनती। चढ़ो गगन क्यों करो अबेरा।

म्हणूनच मी तुला विनंती करतो की त्वरा कर, वर ब्रह्ममध्ये चल. तू उशीर का करीत आहेस?

इन्द्री द्वार विषय अब त्यागों। करो अभी सुलझेरा।।

तू इंद्रियांच्या द्वारांचे तसेच विषय–विकारांचा त्याग कर. जिव्हारूपी इंद्रियांचा स्वाद सोडून दे. अंतर्यातील नामरसाचा स्वाद घे. बाहेरील आंबट–गोड स्वाद सोड. कर्णेंद्रियांसाठी तू बाहेर संगीत–रागामध्ये फिरत असतोस, त्याऐवजी तू अंतर्यातील इंद्रियाचा राग श्रवण कर. अशाच प्रकारची बाकीची इंद्रिये आहेत. त्यांचा स्वाद त्यागून तू अंतर्यात वाटचाल कर.

तुम सा संगी और न कोई। मैं तुम्हरी और तुम ही मेरा।

आपण ज्या जगाची संगत करीत आहोत, ती येथे बाह्य–जगापुरती मर्यादित आहे. आपली खरी संगत ब्रह्मपर्यंतच आहे. तिथपर्यंत आपण दोघे एकत्र जाणार आहोत. तेथे तू तुझ्या घरी रहा आणि मी पुढे निघून जाईन.

मुझ दासी का कहना मानों। गगन मंडल चढ़ बाँधो डेरा।।
जैसे थे तैसे फिर होई हो। क्यों दुख सुख यहाँ सहो घनेरा।।

तू वर चल. तू ब्रह्मस्थानातून आलेला आहेस, तू ब्रह्म बन. या दु:खी नगरात आपण दु:खांमुळे घायाळ झालेलो आहोत. जर कधी थोडेफार सुख अनुभवण्यास मिळाले, तर अहंकार आपल्या मागे लागतो. त्यामुळे आपण पुन्हा दु:खी होतो.

सतगुरू पूरे भेद बताया। मन को संग लेकर घर फेरा।।
मैं हूँ सुरत पड़ी बस तेरे। बिन तुम मदद शब्द नहिं हेरा।।

ही आत्म्याची विनंती आहे की मला माझ्या जीवनामध्ये पूर्ण सतगुरू लाभले आहेत. त्या सतगुरूंनी मला सांगितले आहे की तू मनास सोबत घेऊन ये. मी जन्म-जन्मांतरापासून तुझ्या ताब्यात अडकलेलो आहे. जेथे तू मला नेलेस, तेथे मी गेलो आहे. आता तुझ्या मदतीशिवाय मी ना शब्द श्रवण करू शकतो ना शब्दाशी एकरूप होऊ शकतो. ज्या घरामध्ये पती-पत्नीमध्ये वाद-विवाद होत असतो, ते घर कसे बरे शांत राहू शकते, ते कसे बरे प्रगती करू शकतील? आत्मा परमात्म्याचा अंश असतो. त्यामुळे एका अंशाचे इतर अंशांवर प्रेम असते. आत्म्यास परमात्म्याचे आकर्षण असते, परंतु मन बाह्यजगात भरकटत फिरत असते.

जो यह कहन न मानो मेरी। तो चौरासी करें बसेरा।।
अब तुम दया करो मेरे ऊपर। सुन बिनती खोजो धुन नेरा।।

आता आत्मा मनास सांगत आहे, ''तू जर माझे सांगणे ऐकले नाहीस तर तू अगोदरही चौऱ्यांशी लक्ष योनींच्या फेऱ्यातून आलेला आहेस. या फेऱ्यामध्ये तू कधी गर्दभ बनलास, कधी घोडा बनलास तर कधी बैल बनून शेतकऱ्यांच्या छडीचा मार खात राहिलास. कधी कोणत्या तर कधी कोणत्या

योनीमध्ये तू भरकटत राहिलास. आता ही संधी लाभलेली आहे. तू मला मदत केल्यास आपली चौऱ्यांशी लक्ष योनींच्या फेऱ्यामधून सुटका होईल.''

हम तुम दोनों चढ़ें अधर में। जाकर बसें पहाड़ सुमेरा।।
तुम वहाँ रहना राज कमाना। हम पहुँचें जहँ राधास्वामी डेरा।।

आत्मा मनास सांगत आहे,''आपण दोघे सुमेर पर्वतावर जाऊ, ब्रह्मस्थानात जाऊ. तू तेथे राजा बनून रहा. मी सतपुरुषाकडे निघून जाईन. माझे म्हणणे जर तू ऐकले नाहीस तर तू या पूर्वीही कुत्रा–मांजर म्हणून जन्मला होतास, पुन्हा तू कुत्रा–मांजर म्हणून जन्मास येशील. चौऱ्यांशी लक्ष योनींमध्ये भ्रमण करून तुझे अजूनही समाधान झाले नाही का?''

मन बोला सुर्त से फिर ऐसे। विषय स्वाद मोसे जात न छोड़ा।।

आता मन आत्म्यास प्रेमाने सांगत आहे,''हे प्रिया! मला तुझी विनंती नीट समजली आहे. मला हे माहित आहे परंतु माझ्या बुद्धीवर विषयविकारांच्या विषाचा खूप परिणाम झालेला आहे. मी त्यांच्या आहारी गेलो आहे.''

कैसी करूँ बचन कस मानूं। मैं इन्द्री बस हुआ न थोड़ा।।

मन आत्म्यास सांगत आहे, ''प्रिय आत्मा! मी काय करू? मी काही थोडाफार इंद्रियांच्या आहारी गेलेलो नाही. मी पशु होतो तेव्हाही यांच्या ताब्यात होतो, जेव्हा पक्षी होतो तेव्हा देखील यांनी मला सोडले नाही. मी मनुष्यजन्मामध्ये आलो, तेव्हाही इंद्रियभोगांनी माझी पाठ सोडली नाही. मी कशाप्रकारे यांच्यापासून आपली सुटका करून घेऊ? सर्व काही माहित असूनही मी यांपुढे लाचार झालेलो आहे.''

बुद्धी मनाच्या ताब्यात आहे आणि मन इंद्रियांच्या ताब्यात आहे. इंद्रियांना जे काही हवे असते, ते इंद्रिय प्राप्त करून घेतात. कर्णेंद्रिय संगीत–रागाकडे, जिव्हा इंद्रिय चवदार अन्नाकडे आणि नेत्र इंद्रिय सुंदर रूपांकडे मला आकर्षित करतात. अशीच अवस्था इतर इंद्रियांची आहे.

बल पौरूष में सब ही हारा। अब इन से मेरा चले न जोरा।।

माझ्यात असलेली सर्व शक्ती आणि हिम्मत, मी इंद्रियांच्या आहारी गेल्याने गमावून बसलो आहे. तरीही ते माझी पाठ सोडत नाहीत.

मैं चाहूँ छोडूँ भोगन को। देख भोग बस चले न मोरा।।

आता मन आत्म्यास प्रेमाने सांगत आहे, ''हे बघ प्रिय मित्रा! भोगांचा त्याग करण्याची माझी खूप इच्छा आहे. मी शपथही घेतो की मी पुन्हा असे दुष्कर्म करणार नाही. परंतु जेव्हा कधी एखादा भोग माझ्यासमोर येऊन उभा रहातो, तेव्हा मी माझे ज्ञान-ध्यान, शिकले-वाचलेले सर्व काही विसरून जातो. त्या भोगाकडे ओढला जातो.''

अनेक पती-पत्नी माझ्याकडे येऊन शपथ घेतात की यापुढे आम्ही असे कृत्य करणार नाही. परंतु काही दिवसांनी मन त्यांना पुन्हा राजी करते. मग पती-पत्नीचा दोष सांगतो की हिलाच नियंत्रण राहत नाही आणि पत्नी पतीला दोष देत सांगते की हे रागवतात. तुम्हीच विचार करा! सतगुरूंनी तुम्हांला तसे वचन द्यावयास कुठे सांगितले होते? अगोदर तुम्हीच वचन देता आणि नंतर एकमेकांवर दोषारोप करता. हे सर्व आपल्याकरवी आपले मन करून घेते. हे मन कावेबाजही आहे व हट्टी देखील आहे, ते चतुर तसेच चलाखही आहे. ते दोषही सांगते तसेच पापही करण्यास भाग पाडते.

ही माझ्या पहिल्या विश्वयात्रेमधील घटना आहे की मी पश्चीमी देशातील एका तरुण आणि मजबूत जोडप्याबद्दल सांगत असतो. माझ्याकडे येऊन त्यांनी सांगितले की आम्ही दोघे विवाह करीत आहोत, परंतु आम्ही एकमेकांच्या जवळ मात्र जाणार नाही. मी त्या जोडप्याकडे बारकाईने पाहिले की माझ्या आयुष्यात मी असे जोडपे प्रथमच पाहिले होते. मी म्हणालो हातात कोळसा पकडून जर आपण म्हणालो की हात काळा होऊ नये, हे कसे शक्य आहे? काही काळानंतर त्यांना मुलेही झाली. परंतु आता ते एकमेकांवर दोषारोप

करतात. तो म्हणतो माझे बरोबर आहे तर ती म्हणते माझे बरोबर आहे. त्यांना पाहून मला हसू येते की आपले मन कशाप्रकारे आपल्याशी खेळ खेळते?

स्वामीजी महाराज सांगतात,''मन सांगते की मला खूप पश्चाताप होतो, मी शपथ घेतो. परंतु जगातील विषय-भोग समोर आल्यावर मी ते भोग भोगणे नाकारू शकत नाही.''

आगे पीछे बहुत पछताऊँ। समय पड़े पर होवत चोरा।।

प्रत्येकाच्या मनाची हीच अवस्था आहे. आपण आधी आणि नंतर खूप पस्तावतो, परंतु त्या क्षणी सर्व काही विसरून जातो व दुष्कर्म करतो.

मी माझ्या अगोदर राहत असलेल्या गावाची गोष्ट सांगत असतो. माझ्या शेतामधूनच लोकांचा ये-जा करण्याचा रस्ता होता. एकदा काही अंतरावर नामधारी पंथाचे गुरूसाहेबजी सत्संग करण्यासाठी आले. त्यांनी मला विनंती केली की प्रेमी लोकं सत्संग ऐकण्यासाठी येत नाहीत, तेव्हा आम्हांस खूप वाईट वाटते. मी हसून त्यांना म्हणालो की मी तुम्हांस एक युक्ती सुचवितो की परमार्थासाठी खोटे बोलण्यास काय अडचण आहे? तुम्ही एखाद्या नाच-गाणे करणाऱ्या कलाकाराच्या नावाचा वापर करा. त्यांनी एक रेडिओ गायकाचे नाव वापरून ते सत्संगाच्या वेळी तेथे येणार आहे असे जाहीर केले.

मग अशावेळी काय होणार? एकही नामधारी मागे घरी थांबला नाही. सर्वजण सत्संगास निघाले. सर्वजण माझ्या शेतामधूनच जात होते. मी त्यांना म्हणालो,''भल्या माणसांनो! तुम्ही माझ्यासोबत बसून ध्यान-अभ्यास करा.'' ते म्हणाले की, ''बाबाजी! आम्ही बसू तर खरे, परंतु आमचे मन तर तिकडेच असेल ना!'' त्या काळी पक्का रस्ता नसे. ते लोक दहा मैल पायी चालत गेले. तेथे गेल्यावर त्यांना आढळले की तेथे नाच-गाणे करणारे कोणीच नव्हते. नामधारींच्या गुरूसाहेबांनी सत्संग केला की दररोज उठून संपूर्ण स्नान करा, वाहेगुरूंचा जप करा, चहा पिऊ नका, मद्याच्या जवळही जाऊ नका, मनुष्यजन्म श्रेष्ठ आहे.

अशा गोष्टी त्या लोकांना कशा बरे पसंद पडतील? ते सर्वजण ताबडतोब परतले. मी शेतातच राहत असल्याने तेथेच होतो. मी त्यांना विचारले की काय झाले? ते म्हणाले, बाबाजी! आज आमची थट्टा केली गेली. मी म्हणालो, त्यात थट्टा कसली? ते सांगतात त्यानुसार तुम्ही आचरण करा. त्यांनीदेखील असेच सांगितले ना की तुम्ही परमात्म्याचे स्मरण करा, मनुष्यजन्म श्रेष्ठ आहे. मीदेखील तुम्हांस हेच म्हटले होते की येथे बसून तुम्ही ध्यान-अभ्यास करा. आपली अशीच अवस्था आहे की ऐकण्यासाठी अशी गोष्ट मिळाली की आपण सर्वकाही सोडून देतो, कोणाचेही ऐकत नाही.

कैसे चढ़ूं गगन को प्यारी। मैं चंचल ज्यों दौड़त घोड़ा।।

आता मन आत्म्यास सांगते,''हे प्रिय मित्रा! मी माझ्या घराच्या दिशेने गगनात कशी चढाई करू? माझी अवस्था तर एखाद्या चंचल घोड्याप्रमाणे आहे, जो एके ठिकाणी स्थिर न राहता सतत उड्या मारीत राहतो.''

आपले मन देखील ना निद्रावस्थेत स्थिर असते ना जागृत अवस्थेत. ज्याप्रमाणे फॉस्फरसमधून निर्माण होणारा अग्नी कधी प्रज्वलीत होतो, तर कधी विझून जातो. हवा असो वा नसो दिव्याची ज्योत सतत हलत असते. कासवाचे डोके कधी पाण्यात असते तर कधी पाण्याबाहेर असते. अशीच अवस्था आपल्या मनाची असते.

ताते तोसे कहुं जतन मैं। चल सतगुरू पै करो निहोरा।।

आता आत्मा मनास सांगतो, ''तुझी अवस्था जरी चंचलतेने धावणाऱ्या घोड्याप्रमाणे असली तरी माझे सतगुरू परिपूर्ण आहेत. ते आपणांस असा रस देतील की ज्यामुळे शांती मिळेल, धावपळीपासून आपली सुटका होईल.''

सरन पड़ें मिल कर अब हम तुम। कर सतसंग होयँ कुछ पोढ़ा।।

आपण जाऊन सतगुरू चरणी स्वत:स अर्पण करू. आपण प्रार्थना करू की हे सतगुरू! आम्ही आतापर्यंत खूप गुन्हे केले असून, आता पूर्णपणे थकलेलो आहोत. तुम्ही आम्हांस माफी द्या.

नानक गरीब ढह पया द्वारे हर मेल लयो वडयाई।

आम्ही भटकून भटकून थकलो आहोत. आता तुमचे यातच मोठेपण आहे की तुम्ही आमचा अंगिकार करा. संत दीनांचे कैवारी असतात. आपण जर खऱ्या अंत:करणापासून त्यांच्यापुढे प्रार्थना केली तर जन्म–जन्मांतरापासून भरकटत असणाऱ्या आपल्यासारख्यांना माफी देण्यासाठीच ते जगात आलेले असतात. खरेतर परमात्म्याने संतांकडे अमाप माफी ठेवलेली असते.

दया करें सतगुरू जब अपनी। पल पल राखें मोको मोड़ा।।

मैं अपने बल चढ़ूँ न कब ही। जब लग मिलें न गुरू बंदी छोड़ा।।

आता मात्र मनास त्याच्या घराची आठवण येते. त्यास त्याच्या कमतरतेची कल्पना येते. ते आत्म्यास म्हणते,''प्रिय मित्रा! जोपर्यंत सतगुरू माझ्यावर कृपा करीत नाहीत तोपर्यंत मी स्वत:च्या बळाने वर चढाई करू शकत नाही, स्वगृही जाऊ शकत नाही. तेच क्षणोक्षणी माझे संरक्षण करू शकतात.''

सुन कर सुरत अधिक हरखानी। चल जल्दी वह बंधन तोड़ा।।

आत्मा तर पहिल्यापासूनच परमात्म्यास भेटू इच्छित होता, तो मनाची विनवणी करत होता. जेव्हा मन राजी झाले, तेव्हा आत्मा मनास सांगतो, ''त्वरा कर, लवकर चल, आणखीन विचार करण्याची गरज काय? नामस्मरण करीत अंतर्यात वर चढाई करूया.''

सतसंग सरन गही अब दोनों। भर भर पीवत अमी कटोरा।।

दोघे जेव्हा गुरूंच्या चरणी शरण जातात, तेव्हा त्यांच्यावर हळू–हळू गुरूंच्या वचनांचा परिणाम होऊ लागतो. संत जे वचन बोलतात, त्यामध्ये माधुर्य असते, अमृत असते. आपले मन जेव्हा आत्म्यासोबत सत्संगामध्ये बसते, तेव्हा संत त्यांना अमृत पाजतात ज्यामुळे ते शांत होतात.

आपली अवस्था अशी असते की आपण शरीरास सत्संगात नेतो, परंतु मनास मात्र आपल्यासोबत सत्संगात बसवीत नाही. आपले शरीर सत्संगामध्ये

बसलेले असते परंतु मन बाजारामध्ये वा कामधंद्यामध्ये भरकटत असते. खरेतर आपण मनास समजावण्याच्या हेतुनेच सत्संगामध्ये बसलेलो असतो त्यामुळे मनासदेखील तेथेच ठेवावे.

दोनों मिल कर चढ़े गगन को। शब्द शब्द रस हुए चटोरा।।

ब्रह्मस्थानापर्यंत आत्मा आणि मन दोघांनाही एकत्र जायचे असते. ते स्थूल जग सोडून सुक्ष्म जगात आणि पुढे ब्रह्मस्थानामध्ये जातात. मन ब्रह्मस्थानामधूनच आलेले होते आणि पुन्हा तेथेच पोहचले.

दया करी राधास्वामी उन पर। हीरा मोती लाल बटोरा।।

सतगुरू कृपास्वरूपी आहेत, परंतु आपण किती जीव त्यांच्याकडून कृपा प्राप्त करून घेतो? आत्मा आणि मन दोघे मिळून सहस्त्रदल कमळ, ब्रह्मस्थानात गेले. ब्रह्मस्थानातून निर्माण झालेले मन पुन्हा ब्रह्मस्थानातच समाविष्ट झाले. मनाच्या पकडीतून स्वतंत्र होऊन आत्मा आपल्या स्वगृही, सतलोकात पोहोचला.

स्वामीजी महाराजांनी अतिशय प्रेमाने सांगितले की अगोदर मन विषय–विकारांच्या जंगलामध्ये भरकटत होते. जोपर्यंत कोणी संत वा सतगुरू भेटत नाहीत, आपणांस नाम प्राप्त होत नाही व आपण नामाचे स्मरण करीत नाही तोपर्यंत आपले मन चंचल घोड्याप्रमाणे धावत असते. हे मन ना रात्री स्थिर असते ना दिवसा, ना निद्रावस्थेत स्थिर राहते ना जागृत अवस्थेत तसेच वाचून–शिक्षण घेऊनही ते स्थिरावत नाही. सतगुरूंचे नाम हा एकच त्यास स्थिरावण्याचा उपाय आहे. नामाशिवाय मुक्ती मिळत नाही, नामाशिवाय मन आपल्या आवाक्यातही येत नाही. गुरूसाहेब सांगतात:

राम नाम मन बेधया अवर की करे विचार।

आता आणखीन विचार करण्याची गरज नाही. पुन्हा आपले मन, राम नामाशी तसेच शब्दाशी एकरंग होते.

नाम विसार चले अनमार्ग अंत काल पछताही।



आपण शब्दनाम सोडून इतर कोणत्याही मार्गावर गेलो, मग भले जप–तप केले, पूजा–पाठ केला तरीही अखेरीस आपणांस पश्चातापच होतो. स्वामीजी महाराज सांगतात:

पानी मथे हाथ कुछ नाहीं, खीर मथन आलस भारा।

आपण पाण्यात रावी घुसळत आहोत. पाण्यातून फक्त फेसच येतो, लोणी निघत नाही. दुधापासून बनत असलेले दही घुसळण्यास आपण आळस करतो, सुरत–शब्दाची कमाई करणे टाळतो. बहिर्मुखी कर्मकांड करणे मात्र आपण टाळत नाही. परंतु सर्व कर्मंकांडे फळावरील सालाप्रमाणे आहेत व खरा फळाचा गर आतमध्ये असतो. संत आपले लक्ष कर्मकांडांपासून दूर सारून अंतर्यातील नामाकडे नेतात. जी चव फळाच्या गराची असते ती चव त्याच्या सालामध्ये नसते.

अमेरिकेतील म्हण आहे की एखाद्या झाडाचे फळ खाल्ल्यानंतरच ते किती उच्चप्रतीचे आहे याची जाणीव आपणांस होते. नाम प्राप्त करून, नामस्मरणात समरस होऊन नामास प्रगट केल्यावरच आपणांस जाणीव होते की नामाचे कोणकोणते फायदे आहेत?

आपलेदेखील कर्तव्य आहे की स्वामीजी महाराजांच्या सांगण्यानुसार आपण स्वत:चे जीवन पवित्र बनवावे, आपल्या मनास नेहमीच शब्द–नामाशी जोडून ठेवावे. मनुष्यजन्माची जी संधी परमात्म्याने दिलेली आहे, तिचा पुरेपुर फायदा करू घ्यावा.

राधास्वामी ऐसी मौज दिखाई। मार लिया अब काल कठोरा।।

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
मुंबई तसेच संत-बानी आश्रमातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती

मुंबई शहरातील सत्संगाचा कार्यक्रम

गुरुप्रिय साधुसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजजींच्या अपार कृपेने यंदा मुंबई शहरात सत्संगाचा कार्यक्रम **बुधवार दि. ४ जानेवारी २०१७ पासून रविवार दि. ८ जानेवारी २०१७** पर्यंत खालील पत्त्यावर होईल. सर्व गुरूप्रेमी बंधु-भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की बाबाजींच्या मधुर आठवणीत होणाऱ्या या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ३ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी किंवा ४ जानेवारी २०१७ रोजी सकाळी खालील पत्त्यावर पोहोचून नामस्मरणाचा तसेच संत वचनांचा लाभ घ्यावा. परमपुज्य संत अजायब सिंह महाराजजींचा **भंडारा ८ जानेवारी २०१७** रोजी साजरा केला जाईल.

भूराभाई आरोग्य भवन,
शांतीलाल मोदी मार्ग, मयुर सिनेमाजवळ,
कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७
फोन नं.: ०९३२४६७०३०१, ०९८३३००४०००, ०२२-२४९६५०००

सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रम

२८ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर २०१६
२५ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०१६
२३ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०१६